# R.B.Narayanrao Borawake College, Shrirampur

## Department of Marathi

**Title of Activity: National Webinar**

'साहित्य संशोधन : नव दिशा आणि तंत्र '

**Date of Activity: 29/10/2021**




प्रमुख वक्ते : डॉ. आशुतोष पाटील

सहयोगी प्राध्यापक, भाषा अभ्यास प्रशाळा व

संशोधन केंद्र, कवयित्री बहिणाबाई चौधरी

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव




**प्रमुख वक्ते : डॉ. प्रभाकर देसाई**
**मराठी विभाग प्रमुख**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे**

**Details of Activity with no. of participants included in**

रयत शिक्षण संस्थेचे ,

# रा.ब.न.बोरावके कॉलेज,श्रीरामपूर.जि.अहमदनगर.

नॉक मानांकित ‘A+’ग्रेड (CGPA-३.४४)

अंतर्गत मूल्यमापन कक्ष आणि मराठी विभाग [पदव्युत्तर मराठी अध्ययन व संशोधन केंद्र.]आयोजित

## राष्ट्रीय वेबिनार

## ‘साहित्य संशोधन : नव दिशा आणि तंत्र ’ – अहवाल

आमच्या रा.ब.नारायणराव बोरावके कॉलेजमध्ये अंतर्गत मूल्यमापन कक्ष आणि मराठी विभाग [पदव्युत्तर मराठी अध्ययन व संशोधन केंद्र.]आयोजित राष्ट्रीय वेबिनार दि.२९ ऑक्टोंबर २०२० रोजी स.१०.०० ते दु.1.०० वा.या वेळेत संपन्न झाले.त्याचा अहवाल थोडक्यात पुढीलप्रमाणे----

**स्वागत व प्रास्ताविक** : स.ठीक १०.००वा.सुरु झालेल्या या वेबिनारचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ.शीला गाढे यांनी केले.याप्रसंगी त्यांनी कॉलेज,मराठी विभाग याबद्दल माहिती देऊन वेबिनार घेण्यामागील भूमिका स्पष्ट केली.तसेच,वेबिनारसाठीचे निमंत्रित तज्ज्ञ व्याख्याते ,अध्यक्ष आणि सहभागी प्राध्यापक,विद्यार्थी या सर्वांचे स्वागत केले.

**प्राचार्यांचे मनोगत** : महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.एस.गायकवाड यांनी सर्वांचे स्वागत करून संशोधनाचे महत्व विशद केले.यासंदर्भात बोलतांना त्यांनी दुर्गा भागवत,निर्मलकुमार फडकुले,रा.चिं.ढेरे ,नरहर कुरुंदकर,इरावती कर्वे इ.पूर्वसुरींचे दाखले देऊन मराठी साहित्य क्षेत्रात झालेल्या भरीव संशोधन कार्याची माहिती दिली.या पार्श्वभूमीवर आज नव –तंत्रज्ञानाचा वापर आणि सुविधांचा लाभ करून घेत संशोधन करण्याला मोठा वाव असल्याचे सांगून त्यांनी,विद्यार्थी व प्राध्यापकांद्वारे विविध विषयांवर संशोधन होण्याची अपेक्षा व्यक्त केली.यासाठी वेबिनारच्या अध्यक्षा मा.मीनाताई जगधने यांच्यावतीने वेबिनारसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

**तज्ज्ञ व्याख्यात्यांचा परिचय** : वेबिनारच्या समन्वयक डॉ.उज्ज्वला भोर यांनी प्रथम सत्राचे व्याख्याते डॉ.आशुतोष पाटील आणि त्यानंतर दुसऱ्या सत्राचे व्याख्याते डॉ.प्रभाकर देसाई यांचा परिचय करून दिला.

**प्रथम सत्र व्याख्यान: डॉ.आशुतोष पाटील**

स.१०.३० ते १२.०० या वेळेत 'साहित्य संशोधनाच्या नव्या दिशा'या विषयावर डॉ.आशुतोष पाटील यांचे व्याख्यान संपन्न झाले.आपल्या व्याख्यानात डॉ.पाटील यांनी वर्तमानकालीन संशोधन व्यवहारावर मार्मिक टीका-टिपण्णी करत संशोधनाची सूत्रे विशद केली.संशोधन ही केवळ माहिती संकलनाची प्रक्रिया नाही ;तर ज्ञान निर्मितीची एक बौद्धिक व निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, हा विचार विविध उदा.देऊन त्यांनी उपस्थितांच्या मनावर ठसविला.याबरोबरच वस्तुनिष्ठता,व्यक्तिनिरपेक्षता ,शोधक व व्यासंगी वृत्ती,संशोधन पद्धतींचे ज्ञान असे संशोधनाचे अनेक मापदंड स्पष्ट करून संशोधनाच्या विविध दिशा सूचित केल्या.

यानंतर झालेल्या प्रश्नोत्तर सत्रात डॉ.पाटील यांनी सहभागींकडून विचारल्या गेलेल्या प्रश्नांना सविस्तर व समाधानकारक उत्तरे दिली.

**द्वितीय सत्र व्याख्यान : डॉ.प्रभाकर देसाई**

दु.१२.०० ते १.०० या वेळेत संपन्न झालेल्या या दुसऱ्या सत्रात 'संशोधनामागील भूमिका व लेखन तंत्र' या विषयावर डॉ.प्रभाकर देसाई यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.संशोधन ही एक साधना असल्याचे सांगून ही भूमिका संशोधकांच्या ठिकाणी रुजण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.तसेच संशोधनाचे एक विशिष्ट तंत्र असल्याचेही त्यांनी दाखवून दिले आणि लेखन तंत्राच्या विविध बाबींचा उहापोह केला.

**आभार**: सहसमन्वयक प्रा.डॉ.भास्कर निफाडे यांनी वेबिनारसाठी निमंत्रित तज्ज्ञ व्याख्याते,अध्यक्ष ,प्राचार्य या सर्वांप्रति मौलिक मार्गदर्शन केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.याचबरोबर सहभागी व सहकार्य करून वेबिनार यशस्वीतेसाठी मदत करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

या वेबिनारसाठी ३३७ सहभागींनी नोंदणी केली होती.एका महत्वाच्या व आवश्यक विषयावर वेबिनार आयोजित केल्याबद्दल अनेकांनी संयोजकांचे आभार मानून अभिनंदन केले.

डॉ.उज्ज्वला भोर , प्राचार्य,

वेबिनार समन्वयक                                             रा. ब. ना.बोरावके कॉलेज,श्रीरामपूर